
डॉ. अशोक दा. रानडे आता पंचाहत्तरीच्या जवळपास आहेत. परंतु अपरिहार्यपणे वाढणाऱ्या वयाचा आणि व्यासंगाचा बऱ्याच जणांना वृद्ध करणारा भार त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडलेला नाही. खूपच ताजे आहेत ते. संगीताच्या क्षेत्रातली व्यासंगी मंडळी बऱ्याचदा 'माझ्यानंतर आता या क्षेत्राचं काही खरं नाही...' अशा छापाचे उसासे टाकत असतात. हे असं म्हातारं करणारं वृद्धपण डॉ. रानडे यांना अजून शिवलेलं नाही. संगीतातले नवनवे प्रयोग- अगदी फ्युजनसुद्धा त्यांना असंगीत वाटत नाही. चित्रपट संगीतही त्यांना रागदारीइतकंच महत्त्वाचं वाटतं. किंबहुना, 'रागदारी संगीत ही उगाचच साडेतीन टक्क्यांची मक्तेदारी बनलेली आहे,' असं धाडसी विधान करण्याइतकी ताकद त्यांच्या छातीत आजही आहे. 'देवगाणी', 'बैठकीची लावणी', 'त्रिभंग ते अभंग', 'मानापमानातील गाणी' असे अनेक प्रयोग करणाऱ्या रानडे यांच्याकडे आजही नवनवीन प्रयोगांच्या योजना तयार आहेत. हिंदी चित्रपट संगीतावर त्यांचं एक पुस्तकही पॉप्युलरतर्फे लवकरच येतंय. हे सगळं त्यांच्याकडून जाणून घ्यायचं होतं. त्यासाठी निमित्तही होतं- 'चतुरंग'तर्फे जाहीर झालेला जीवनगौरव पुरस्कार! पण गेल्या आठवड्यात मलेरियाच्या डासानं त्यांना हैराण केलं होतं. तेव्हा गप्पा मारायला जाणं कितपत सयुक्तिक, असा प्रश्न होता. तो रानडे यांनीच सोडवला. 'भेटायला या,' म्हणाले. त्यांना ऐकणं हा एक संपूर्ण आनंद असतो. रानडे नादमय आणि नेमकं बोलतात. त्यांचं वाक्य समेवर आल्यासारखं सहज संपतं. आवंढा गिळलाय, मधेच श्वास संपलाय, त्यामुळे वाक्य अडलंय, असं कधीच होत नाही त्यांचं. त्यांच्या बोलण्यात एक लय असते. आग्रह असतो. पण अभिनिवेश मात्र नसतो. आणि जिभेवर असते एक अनवट, तरीही लोभस शब्दकळा. टी. एस. इलियट, बर्नार्ड शॉ, रसेल ते होनाजी बाळा, राम जोशी व्हाया अभिनव गुप्त अशी सर्व मंडळी रानडे यांच्या हाताशी असतात. त्यामुळे त्यांच्याबरोबरच्या संवादाला प्रवाहाबरोबर खोलीही असते. त्यांच्याशी झालेल्या स्वैर गप्पाष्टकाचा हा गोषवारा...

*तुमच्यासारख्या पंडिताने चित्रपट संगीताला इतकं महत्त्व देणं म्हणजे जरा जास्तच होतंय असं नाही का...?*

- चित्रपट संगीत हे आजच्या काळाचं लोकसंगीतच आहे. भारतीय रागसंगीत हे जेमतेम साडेतीन टक्क्यांचं आहे. संगीताच्या विशाल रूपाकडे नजर टाकली तर आढळेल की, ते सहा भागांत विभागलंय. आदिम, लोक, धर्म, कला, जनप्रिय आणि सुगम संगीत. जवळपास दोन हजार वर्षांची परंपरा आहे ही. रागसंगीत या संपूर्ण परंपरेचा फक्त एक भाग आहे, हे एकदा लक्षत घेतलं की केवळ रागसंगीतावरच कशी काय चर्चा होऊ शकते? इतरांचं अस्तित्व नाकारून कसं चालेल? लहानपणापासून काय काय ऐकत असतो आपण! या सगळ्याकडे आपण कसं काय दुर्लक्ष करणार? संपूर्ण भारतीय संगीत ज्याला कळलंय, अशाच्या मी शोधात आहे.

*पण तरी शास्त्रीय संगीत... क्लासिकल म्युझिक हे या सगळ्याच्या वरचं, असं मानायचा प्रघात आहे...*

- इंग्रजांच्या आधी क्लासिकल म्युझिक असा काही प्रकार नव्हता. ती त्यांची देणगी. आपण अजूनही हा शब्द वापरणं हे आपल्या गुलामगिरीच्या मानसिकतेचं लक्षण आहे. आधी होतं ते पक्का गाना किंवा शास्त्रोक्त संगीत. जे शास्त्र उक्त होतं ते शास्त्रोक्त. असं कोणतंही संगीत नाही, की ज्याला शास्त्र नाही. अशी कोणतीही भाषा नाही, जिला व्याकरण नाही; तसंच आहे हे. तेव्हा नुसतं शास्त्रीय संगीतच महत्त्वाचं, असं कसं म्हणणार? असं करून आपण काय लोकसंगीताला बाद करणार आहोत का? मग भावसंगीताचं काय करायचं? चित्रपट संगीत किंवा अन्य कोणतंही संगीत गुणवत्तेत कमी नाही. तसं ते आहे, असं मानून विचारार्थच घ्यायचं नाही, हा कृतघ्नपणा झाला. तो होतो, कारण क्लासिकलवाले म्हणवून घेणारे ढोंगी आहेत. आपल्याला जे आवडत नाही, ते का आवडत नाही; आणि आवडत




असेल, तर का आवडतं, ते सांगता आलं पाहिजे. हे केलं जात नाही. कारण ते रूढीवादी आहेत. मी मुंबई विद्यापीठात असताना शंकर शंभू यांच्या कव्वालीचा कार्यक्रम ठेवला होता. क्लासिकलवाल्यांनाही बोलावलं होतं. खूपजण आले होते. त्यातले प्रामाणिक होते पं. फिरोझ दस्तुर यांच्यासारखे- ते म्हणाले, 'आपल्याला जो परिणाम साधायला तीन तास लागतात, तो या लोकांनी तीन मिनिटांत साधला.' असं त्यांनाही वाटलं म्हणजे बघा!

*म्हणजे क्लासिकलवाल्यांपेक्षा लोकसंगीतवाले जास्त प्रामाणिक असतात असं म्हणायचं का?*

- कोण चांगलं, कोण वाईट, हा मुद्दाच नाही. संगीत आपापल्या ठिकाणी आहे. आपल्यात प्रामाणिक मूल्यमापनाची ताकद नाही, ही खरी समस्या आहे. सगळ्या संगीताला तेच म्हणायचं नसतं, हे आपण लक्षात घेत नाही. संगीताला मोठं होण्यासाठी आपल्या असण्याची गरज नसते, तर आपण जे काही करतोय त्यात संगीत असायला लागतं.

*पण पाश्चात्य संगीताचा आपल्यावरचा प्रभाव वाढत चाललाय, अशी एक खंत... तक्रार सारखी ऐकायला येते. आपल्या तुलनेत पाश्चात्य संगीत बांधलं गेलेलं आहे, असंही मानलं जातं...*

- आपल्याला वाटतं तितकं पाश्चात्य संगीत साचेबद्ध नाही. आणि आपल्याला वाटतं तितकं आपलं संगीत इम्प्रोव्हाइज्डही नाही. आपल्याकडे या सगळ्याचं योग्य ते मूल्यमापन होत नाही, हाच तर मुद्दा आहे! आपण एक तर स्मृतिरंजनात तरी जातो आणि उदात्तीकरण करतो किंवा मग एकदम न्यूनगंडात जातो.

*नौशाद यांच्यासारखे संगीतकार शेवटी शेवटी म्हणायचे, 'आता काही गाणं पूर्वीसारखं राहिलेलं नाही,*


लोक

लोक

चतुरंग प्र
संगीतज्ञ
डिसेंबर र
प्रदान कर
त्याचं वर्त
मनमोकळ
यांचा लेख



नाही;
संगीत
कसं
आपल




असेल, तर का आवडतं, ते सांगता आलं पाहिजे. हे केलं जात नाही. कारण ते रूढीवादी आहेत. मी मुंबई विद्यापीठात असताना शंकर शंभू यांच्या कव्वालीचा कार्यक्रम ठेवला होता. क्लासिकलवाल्यांनाही बोलावलं होतं. खूपजण आले होते. त्यातले प्रामाणिक होते पं. फिरोझ दस्तुर यांच्यासारखे- ते म्हणाले, 'आपल्याला जो परिणाम साधायला तीन तास लागतात, तो या लोकांनी तीन मिनिटांत साधला.' असं त्यांनाही वाटलं म्हणजे बघा!

*म्हणजे क्लासिकलवाल्यांपेक्षा लोकसंगीतवाले जास्त प्रामाणिक असतात असं म्हणायचं का?*

- कोण चांगलं, कोण वाईट, हा मुद्दाच नाही. संगीत आपापल्या ठिकाणी आहे. आपल्यात प्रामाणिक मूल्यमापनाची ताकद नाही, ही खरी समस्या आहे. सगळ्या संगीताला तेच म्हणायचं नसतं, हे आपण लक्षात घेत नाही. संगीताला मोठं होण्यासाठी आपल्या असण्याची गरज नसते, तर आपण जे काही करतोय त्यात संगीत असायला लागतं.

*पण पाश्चात्य संगीताचा आपल्यावरचा प्रभाव वाढत चाललाय, अशी एक खंत... तक्रार सारखी ऐकायला येते. आपल्या तुलनेत पाश्चात्य संगीत बांधलं गेलेलं आहे, असंही मानलं जातं...*


- आपल्याला वाटतं तितकं पाश्चात्य संगीत साचेबद्ध नाही. आणि आपल्याला वाटतं तितकं आपलं संगीत इम्प्रोव्हाइज्डही नाही. आपल्याकडे या सगळ्याचं योग्य ते मूल्यमापन होत नाही, हाच तर मुद्दा आहे! आपण एक तर स्मृतिरंजनात तरी जातो आणि उदात्तीकरण करतो किंवा मग एकदम न्यूनगंडात जातो.

*नौशाद यांच्यासारखे संगीतकार शेवटी शेवटी म्हणायचे, 'आता काही गाणं पूर्वीसारखं राहिलेलं नाही, हिंदी संगीतात आता क्लासिकलला काही किंमत नाही,' वगैरे...*


- जगात सगळ्यात बदल होत आहेत. मग ते संगीतात नाही होणार? आणि दुसरं म्हणजे- माझ्या हयातीत काही घडलं नाही, म्हणून संगीतात काही घडत नाही, असं मानणं बरोबर नाही. संगीताची परंपरा दोन हजार वर्षांची आहे. आता त्या तुलनेत आपलं आयुष्य किती? सर्व मांडणीत स्वतःला केंद्रबिंदू करायची सवय लागली की असं होतं. माझ्या आयुष्यात मी रोशन आरा कधी ऐकू शकलो नाही. पण म्हणून त्या बाईंचं गाणं मी नाकारायचं का? आता नौशाद भारतीय संगीताविषयी आग्रहाने बोलतात. मग त्यांच्या संगीतात पियानो कसा? ते काय भारतीय वाद्य आहे? मग त्यांनी हार्मोनियम, व्हायोलिन ही वाद्यं पण वापरायला नको होती. संगीताच्या व्यापातलं एक- दशांशही आपल्याला कळत

लोकसत्ता
लोकरंग

■ रविवार १२ डिसेंबर २०१०



छाया- वसंत प्रभु



**चतुरंग प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार यंदा व्यासंगी संगीतज्ञ डॉ. अशोक दा. रानडे यांना जाहीर झाला आहे. येत्या १६-१७ डिसेंबर रोजी गोव्यात होणाऱ्या रंगसंमेलनात तो त्यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने एकूणच संगीताबद्दल, तसंच त्याचं वर्तमान आणि भवितव्याबद्दल डॉ. रानडे यांच्याशी केलेल्या या मनमोकळ्या गप्पा. रानडे यांच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेणारा अंबरीश मिश्र यांचा लेख आतील पानात-**

■ **गिरीश कुबेर**

ाला मोठं होण्यासाठी आपल्या
, तर आपण जे काही करतोय
लागतं.

*गीताचा आपल्यावरचा प्रभाव
गी एक खंत... तक्रार सारखी
तुलनेत पाश्चात्य संगीत बांधलं
नलं जातं...*

टतं तितकं पाश्चात्य संगीत
आपल्याला वाटतं तितकं आपलं
ाही. आपल्याकडे या सगळ्याचं
त नाही, हाच तर मुद्दा आहे!
तिरंजनात तरी जातो आणि
ा मग एकदम न्यूनगंडात जातो.

*खे संगीतकार शेवटी शेवटी
गाणं पूर्वीसारखं राहिलेलं नाही,
हिंदी संगीतात आता क्लासिकलला काही किंमत नाही,' वगैरे...*

- जगात सगळ्यात बदल होत आहेत. मग ते संगीतात नाही होणार? आणि दुसरं म्हणजे- माझ्या हयातीत काही घडलं नाही, म्हणून संगीतात काही घडत नाही, असं मानणं बरोबर नाही. संगीताची परंपरा दोन हजार वर्षांची आहे. आता त्या तुलनेत आपलं आयुष्य किती? सर्व मांडणीत स्वतःला केंद्रबिंदू करायची सवय लागली की असं होतं. माझ्या आयुष्यात मी रोशन आरा कधी ऐकू शकलो नाही. पण म्हणून त्या बाईंचं गाणं मी नाकारायचं का? आता नौशाद भारतीय संगीताविषयी आग्रहाने बोलतात. मग त्यांच्या संगीतात पियानो कसा? ते काय भारतीय वाद्य आहे? मग त्यांनी हार्मोनियम, व्हायोलिन ही वाद्यं पण वापरायला नको होती. संगीताच्या व्यापातलं एक- दशांशही आपल्याला कळत नाही; पण अट्टहास मात्र सर्व संगीताविषयी बोलण्याचा! हे कसं चालेल? हा अधिकार आपल्याला कोणी दिला?

*सध्या सर्वच कलांच्या बाजारीकरणाविषयी सार्वत्रिक चिंता व्यक्त केली जातेय. तुम्हाला नाही वाटतं- परिस्थिती काळजी वाटावी अशी आहे, असं?*

(पान १० पाहा)

रविवार १२ डिसेंबर २०१०

# नादमय आणि नेमकं

(पान १ वरून) - संगीत हा जीवनाचा भाग आहे. जीवनात जे- जे घडतंय, ते संगीतातही घडणार. संगीत ही काही आयसोलेटेड एन्टिटी नाही. पूर्वी संगीतात एक कर्तव्याची भावना होती. तेवढा वेळ त्यासाठी होता. आजच्या युगात ज्याला आपण संगीत व्यवसाय म्हणतो, त्यातही ताणतणाव आहेत. संगीत ही एक कमोडिटी बनलीय. तेव्हा ती लवकरात लवकर, जास्तीत जास्त किमतीला विकता यायला हवी, असं त्या क्षेत्रातल्यांना वाटतं. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत हे होतंय. हे असं होतच असतं. त्यामुळे सगळं काही संपलंय असं मानायचं कारण नाही.

*ज्या लोकसंगीताला आपण इतकं महत्त्व देतो ते लोकसंगीतही बदलतंय. जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रांवर अमेरिकीकरणाची छाया पडलीय. ती या क्षेत्रावरही आहे, असं नाही वाटत?*

- बदलतंय ना! लोकसंगीतही बदलतंय. पण आपल्या पोटात खूप काही घ्यायची ताकद या संगीतात आहे. आणि एक लक्षात ठेवायला हवं की, कलेला असं भौगोलिक, आर्थिक सीमांमध्ये नाही बांधून ठेवता येत. कलाकार खरा भटक्या असतो. दहाव्या शतकात अभिनव गुप्त याने काश्मिरात 'अभिनव भारती' हा ग्रंथ लिहिला. शंभर वर्षं व्हायच्या आत त्याच्यावरील टीका केरळात प्रसिद्ध झाली होती. होनाजी बाळा आणि रामनिधी गुप्ता हे समकालीन. एक आपल्याकडे, तर दुसरा बंगालमध्ये. पण दोघंही जे करत होते त्यात खूप साम्य आहे... एकच सूत्र आहे. आता हे कसं झालं त्यावेळी? कला हा खूप मोठा मूव्हिंग फोर्स असतो.

*हो... खरंय तुमचं म्हणणं. आजच्या काळात कुमार गंधर्वांचे प्रयोग याची जाणीव करून देतात...*

- माझ्या मते, कुमार हा एक असा कलाकार होता, की त्यानं जे काही केलं त्यामागे मोठा विचार होता. त्याचा आवाका खूप मोठा होता.

*आता या सगळ्या प्रयोगांना फ्युजनने ग्रासलंय...*

- मला वाटतं फ्युजन हे कन्फ्लुअन्सचं पूर्वरूप आहे. याआधीही असे प्रयोग झालेत. रविशंकर यांनी यहुदी मेन्युहीनबरोबर असे प्रयोग केलेत. तेव्हा हे सगळं आताच होतंय असं मानायचं काही कारण नाही.

*पण आता सगळ्यांचा सूर असा असतो की, या फ्युजनचा दुरुपयोग होतोय, आपली संगीत परंपरा त्यामुळे लयाला जाईल, वगैरे...*

- आपल्याकडे कोणत्या चांगल्या गोष्टींचा दुरुपयोग होत नाही? तेव्हा हे चालायचंच!

*मग आताचं संगीत...*

- मला मुळीच खिन्न करत नाही. तुम्ही-आम्ही समजतो तशी परंपरा थांबलेली नसते. ती अशी कुठे एके ठिकाणी रुतलेली नसते... वाहती असते. आपल्या अख्ख्या देशात ज्याला संगीताचा कान नाही अशी व्यक्ती शोधून सापडणार नाही. आपण मात्र स्मरणरंजनातून बाहेर पडायला हवं. स्मरणरंजन आणि स्वप्नरंजन एकत्र आलं तरच हातून काही मोठं काम होऊ शकतं. ■